सुविचार

आपल्या यशाची व्याख्या जर भक्कम असेल तर आपण सदैव अपयशाच्या दोन पाऊले पुढे असू.

दैनिक
# आरंभ मराठी

www.arambhmarathi.com

■ कोल्हापूर ■ सांगली ■ सातारा ■ सोलापूर ■ धाराशिव ■ लातूर ■ वर्ष 3 रे ■ अंक 69 ■ मंगळवार, 2 जून 2026 ■ पाने 04 ■ किंमत रू.4 ■ epaper.arambhmarathi.com



SS MOBILE®
धाराशिव जिल्ह्यात सर्वाधिक मोबाईल विक्री होणारे, विश्वसनीय ठिकाण.
(नवनवीन ऑफर जाणून घेण्यासाठी आजच संपर्क करा)
जिजाऊ चौक, बार्शी नाका, धाराशिव.
Mo.7841810075/8329723615


# स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ निवडणुकीसाठी महायुती आणि महाविकास आघाडीचे अर्ज दाखल

## ■ महाविकास आघाडीतून शिवसेना (उबाठा) पक्षाची बंडखोरी

## ■ आज होणार छाननी; गुरुवारी उमेदवारी अर्ज मागे घेता येणार

आरंभ मराठी । धाराशिव

**धाराशिव - लातूर - बीड स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विधानपरिषद निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या अखेरच्या दिवशी महायुती आणि महाविकास आघाडी या दोन्हीही गटांच्या उमेदवारांनी आपापले उमेदवारी अर्ज दाखल केले. महायुतीकडून माजी मंत्री बसवराज पाटील यांनी अर्ज दाखल केला. तर महाविकास आघाडीकडून काँग्रेसचे कवठा जिल्हा परिषद गटातील सदस्य महेश देशमुख यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी शिवसेना (उबाठा) पक्षाकडून कळंबचे संजय मुंदडा आणि धाराशिवचे नगरसेवक सचिन राजाभाऊ पवार यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. अखेरच्या दिवसापर्यंत एकूण 9 उमेदवारांनी 14 उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. आज अर्जाची छाननी होणार असून, गुरुवारी (दि.4) उमेदवारी अर्ज मागे घेता येणार आहेत.**

धाराशिव - लातूर - बीड स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विधानपरिषद निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा सोमवारी अखेरचा दिवस होता. अखेरच्या दिवशी एकूण 6 उमेदवारांनी आपापले उमेदवारी अर्ज दाखल केले. यामधे भाजपकडून माजी मंत्री बसवराज पाटील यांनी तर काँग्रेसकडून महेश देशमुख यांनी अर्ज दाखल केले. इतर चार उमेदवारांनी अपक्ष अर्ज दाखल केले. अखेरच्या दिवसापर्यंत एकूण 9 उमेदवारांनी 14 उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. सोमवारी अर्ज दाखल करण्याचा अखेरचा दिवस होता. तत्पूर्वी रविवारी रात्री उशिरा भाजपच्या उमेदवारांची यादी जाहीर करण्यात आली. यामधे बसवराज पाटील यांना भाजपने उमेदवारी दिली. दुपारी सव्वा बारा वाजता भाजपचे उमेदवार बसवराज पाटील हे समर्थकांसह उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी आले. यावेळी त्यांच्यासोबत आमदार राणा पाटील, प्रदेश उपाध्यक्षा अर्चना पाटील चाकूरकर, औसा येथील आमदार अभिमन्यू पवार, आमदार सुरेश धस, आमदार रमेश कराड, भाजप जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी, बीड आणि लातूर येथील भाजपचे जिल्हाध्यक्ष यांच्यासह महायुतीचे नेते आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. बसवराज पाटील हे उमेदवारी अर्ज दाखल करतानाच काँग्रेसचे उमेदवार महेश देशमुख हे महाविकास आघाडीच्या नेत्यांसह दाखल झाले. यावेळी त्यांच्यासोबत खासदार ओमराजे निंबाळकर, आमदार कैलास पाटील, आमदार प्रवीण स्वामी, काँग्रेस जिल्हाध्यक्ष उमेशराजे निंबाळकर, माजी जिल्हाध्यक्ष विश्वास शिंदे, जीवनराव गोरे, डॉ. प्रतापसिंह पाटील, अभय साळुंके, राहुल सोनवणे, महिला काँग्रेसच्या प्रदेश उपाध्यक्षा स्मिता शहापूरकर, लातूरच्या महापौर जयश्री सोनकांबळे, आशाताई भिसे, तनुजा हेड्डा, खालिफा कुरेशी, डॉ. शिवाजीराव जवळगेकर यांची उपस्थिती होती. महायुती आणि महाविकास आघाडी या दोन्ही गटाच्या उमेदवारांनी विजयाचे दावे केले.





### शिवसेना (उबाठा) पक्षाच्या दोघांची बंडखोरी

महाविकास आघाडीत ही जागा काँग्रेसला सुटल्यामुळे शिवसेना (उबाठा) पक्षाचा दोन नेत्यांनी बंडखोरी करत अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. कळंबचे शिवसेनेचे नेते संजय मुंदडा आणि धाराशिव नगरपालिकेतील नगरसेवक सचिन पवार यांनी अपक्ष अर्ज दाखल केल्यामुळे महाविकास आघाडीत सर्व काही आलबेल असल्याचे दिसत नाही. आज उमेदवारी अर्जांची छाननी होणार आहे तर गुरुवारी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा दिवस आहे. तोपर्यंत या दोन्ही उमेदवारांना अर्ज माघारी घेण्याची विनंती केली जाईल. दुसरीकडे महायुतीतील शिवसेना पक्षातील पनुरे वगळता कोणीही बडा नेता उमेदवारी अर्ज दाखल करताना उपस्थित नव्हता. अनिल खोचरे यांनी पत्रकार परिषदेला उपस्थित राहत शिवसेना सोबत असल्याची ग्वाही दिली.

### यांनी दाखल केले उमेदवारी अर्ज

१) बसवराज माधवराव पाटील, औसा- भाजपा
२) महेश माणिकराव देशमुख रा.पेठसांगवी ता.उमरगा - काँग्रेस
३) अहमदखान सय्यद नूर राज सय्यद, माजलगाव- अपक्ष
४) अर्चना विनोद गंगणे - तुळजापूर - अपक्ष
५) सहालबिन आमेर चाऊस - माजलगाव - अपक्ष
६) सचिन भारतराव पवार - धाराशिव - अपक्ष
७) संजय पांडुरंगजी मुंदडा, कळंब - अपक्ष
८) महालिंगे मिलिंद गणपती - चाकूर - अपक्ष
९) शरद रामभाऊ यादव - माजलगाव - अपक्ष

### भाजपकडे निवडून येण्यास मुबलक संख्याबळ

धाराशिव, लातूर आणि बीड या तीन जिल्ह्यात मिळून एकूण 988 मतदार आहेत. यामधे भाजपचे 337, राष्ट्रवादी अजित पवार पक्षाचे 199 आणि शिवसेना पक्षाचे 88 असे महायुतीकडे एकूण 624 मतदार आहेत. तर तीन जिल्ह्यात मिळून 107 अपक्ष उमेदवार निवडून आलेले आहेत. यापैकी 85 अपक्ष उमेदवार हे महायुतीच्या बाजूने असल्याचा दावा भाजपने केला आहे. त्यामुळे या निवडणुकीत 700 पेक्षा अधिक मतदान महायुतीच्या उमेदवाराला मिळेल असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

## तुळजापूर बसस्थानकावर प्रवाशाच्या गळ्यातील सोन्याची चैन लंपास

आरंभ मराठी । तुळजापूर

तुळजापूर येथील जुने बसस्थानक परिसरात बसमध्ये चढत असताना एका प्रवाशाच्या गळ्यातील सोन्याची चैन अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना रविवारी (दि. 31 मे) सकाळी घडली. याबाबत शंकर गोविंद कदम (वय 55, रा. मालाड पश्चिम, मुंबई) यांनी तुळजापूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादीनुसार, ते दि. 31 मे रोजी सकाळी सुमारे 9.05 वाजता तुळजापूर येथील जुने बसस्थानकातून तुळजापूर-मालवण बसमध्ये चढत होते. त्यावेळी गर्दीचा फायदा घेत अज्ञात व्यक्तीने त्यांच्या गळ्यातील सुमारे दोन तोळे वजनाची, अंदाजे 30 हजार रुपये किमतीची सोन्याची चैन चोरून नेली. या प्रकरणी शंकर कदम यांच्या फिर्यादीवरून तुळजापूर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (भा.न्या. सं.) कलम 303(2) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## तिकीटाच्या सुट्ट्या पैशांवरून वाद; शासकीय कर्मचाऱ्यास मारहाण, गुन्हा दाखल

**धाराशिव** :- तिकीटाच्या सुट्ट्या पैशांवरून झालेल्या वादातून शासकीय कर्मचाऱ्यास शिवीगाळ व मारहाण करून शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी एका व्यक्तीविरुद्ध ढोकी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी सौदागर आण्णा होगले (रा. कसबे तडवळा, ता. धाराशिव) यांनी दि. 30 मे 2026 रोजी सायंकाळी सुमारे 6.40 वाजता कसबे तडवळा येथे फिर्यादी मारोती दत्ताराव सुरोशे (वय 35, व्यवसाय नोकरी, रा. गारगव्हाण, ता. हदगाव, जि. नांदेड) यांच्याशी तिकीटाच्या सुट्ट्या पैशांवरून वाद घातला.या वादातून आरोपीने फिर्यादीस शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी मारहाण करून जखमी केले. तसेच शासकीय कामात अडथळा निर्माण केला. दरम्यान, हे भांडण सोडविण्यासाठी आलेल्या चालकासही आरोपीने धक्काबुक्की केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.याप्रकरणी मारोती सुरोशे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून ढोकी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम 132, 121, 351(2) व 352 अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## डोंगरेवाडीत मांजरा नदीपात्रातून ८० ब्रास वाळूची चोरी; १३ जणांविरुद्ध गुन्हा

आरंभ मराठी । वाशी

वाशी तालुक्यातील डोंगरेवाडी येथे मांजरा नदीच्या पात्रातून विनापरवाना वाळू उपसा करून शासनाचे नुकसान केल्याप्रकरणी 13 जणांविरुद्ध वाशी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी सुरज शेषेराव भराटे, मेघराज बालाजी भराटे, मंगेश राजाराम भराटे, विलास रमेश कुरुंद, किरण रमेश कुरुंद, संतोष आबादेव तांबडे, धनराज बालाजी भराटे, अशोक गोरख भराटे, अमोल आत्माराम भराटे, यश बाळासाहेब भराटे, सिद्धेश्वर लक्ष्मण कुरुंद, निवृत्ती लिंबराज भराटे आणि सर्जेराव सुखदेव भराटे (सर्व रा. डोंगरेवाडी, ता. वाशी, जि. धाराशिव) यांनी 21 मे 2026 रोजी रात्री 11 ते 22 मे रोजी पहाटे 5 वाजण्याच्या दरम्यान मांजरा नदीच्या पूर्व बाजूच्या पात्रातून अंदाजे 80 ब्रास वाळूची चोरी केल्याचा आरोप आहे. या अवैध उत्खननामुळे सुमारे 7 लाख 20 हजार रुपयांच्या वाळूचा अपहार झाला असून सार्वजनिक मालमत्तेचेही नुकसान झाल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. याप्रकरणी फिर्यादी दिनेश वैजिनाथ बहिरमल (वय 37, रा. बीड) यांनी 31 मे 2026 रोजी दिलेलेल्या तक्रारीवरून वाशी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम 303(2), 324(5), 3(5), खाण व खनिज अधिनियम कलम 4 व 21, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता कलम 48(7), 48(8) तसेच पर्यावरण संरक्षण अधिनियम कलम 15 अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास वाशी पोलीस करीत आहेत.

## वीज कोसळून पाच हजार कडब्याची गंज भस्मसात

**येरमाळा** :- येरमाळा परिसरात अवकाळी पावसासह झालेल्या वादळी वातावरणात वीज कोसळून शेतातील कडबा गंजीला आग लागल्याची घटना शनिवारी (दि.31) सायंकाळी घडली. या दुर्घटनेत शेतकरी सोमनाथ जगन्नाथ शेटे यांच्या सुमारे पाच हजार कडब्यांचा साठा जळून खाक झाला असून त्यांचे हजारो रुपयांचे आर्थिक नुकसान झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, येरमाळा शिवारातील आपल्या शेतात सोमनाथ शेटे यांनी जनावरांच्या चाऱ्यासाठी मोठ्या प्रमाणात कडबा साठवून ठेवला होता. शनिवारी दुपारनंतर परिसरात अचानक ढगाळ वातावरण निर्माण झाले. त्यानंतर जोरदार वाऱ्यासह पावसाला सुरुवात झाली. याचदरम्यान झालेल्या कडकडाटात वीज थेट कडबा गंजीवर कोसळली. त्यामुळे काही क्षणांतच गंजीने पेट घेतला. उन्हाळ्यामुळे कडबा पूर्णपणे कोरडा असल्याने आगीने झपाट्याने रौद्ररूप धारण केले. आग इतक्या वेगाने पसरली की संपूर्ण गंजी काही वेळातच जळून खाक झाली. घटनेची माहिती मिळताच परिसरातील शेतकरी आणि ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेत आग विझविण्याचा प्रयत्न केला. मात्र आगीची तीव्रता मोठी असल्याने कडब्याचा साठा वाचविणे शक्य झाले नाही. या आगीत अंदाजे पाच हजार कडब्यांचे नुकसान झाले असून जनावरांच्या चाऱ्याचा मोठा साठा नष्ट झाला आहे. त्यामुळे आगामी काळात जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. आधीच वाढत्या उत्पादन खर्चामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत असताना या नैसर्गिक आपत्तीमुळे शेटे यांना मोठा आर्थिक फटका बसला आहे. घटनेची माहिती महसूल प्रशासनाला देण्यात आली असून पंचनामा करून नुकसान भरपाई देण्याची मागणी शेतकरी व ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. शासनाने तातडीने मदत जाहीर करून नुकसानग्रस्त शेतकऱ्याला दिलासा द्यावा, अशी मागणी परिसरातून होत आहे.



आरंभ मराठी

### तुळजाभवानी मातेच्या भाविकांच्या निवासाची होणार सोय

## तुळजापुरात भव्य भक्तनिवासाचे भूमिपूजन

आरंभ मराठी । तुळजापूर

तुळजापूर येथील जंगम मठ परिसरात होटगी मठ संस्थानच्या वतीने उभारण्यात येणाऱ्या भव्य भक्तनिवासाच्या भूमिपूजनाचा सोहळा उत्साहात पार पडला. या भक्तनिवासामुळे श्री तुळजाभवानी देवीच्या दर्शनासाठी देशभरातून येणाऱ्या भाविकांच्या सुविधेत मोठी भर पडणार असल्याचे प्रतिपादन काशीपीठाचे जगद्गुरू डॉ. मल्लिकार्जुन महास्वामी यांनी केले. भूमिपूजनानंतर झालेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी पंढरपूर देवस्थान समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, आमदार विजयकुमार देशमुख, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा अर्चनाताई पाटील, नगराध्यक्ष विनोद गंगणे, गुड्डापूर देवस्थान समितीचे सिद्धया स्वामी, ज्येष्ठ नेते आप्पासाहेब पाटील, जिल्हा परिषद बांधकाम सभापती सिद्धेश्वर कोरे, रामप्पा चिवडशेट्टी, अमर मगर, औदुंबर कदम, रणजीत इंगळे, आनंद जगताप, राजाभाऊ मुंडे, गुरुनाथ बडूरे आदी मान्यवर उपस्थित होते. गहिनीनाथ महाराज औसेकर, अर्चनाताई पाटील आणि विनोद गंगणे यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले. त्यानंतर कोनशिलेचे अनावरण करण्यात आले. यावेळी बोलताना जगद्गुरू डॉ. मल्लिकार्जुन महास्वामी म्हणाले की, श्री तुळजाभवानी देवीचे महात्म्य संपूर्ण देशभर पसरले असून दररोज लाखो भाविक दर्शनासाठी येथे येतात. त्यामुळे नव्याने उभारण्यात येणारे भक्तनिवास भाविकांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. तसेच या ठिकाणी महादेव मंदिर आणि सभामंडपही उभारण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली. अर्चनाताई पाटील यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, काशीपीठाच्या जगद्गुरूंच्या आशीर्वादाने या प्रकल्पाचे भूमिपूजन झाले असून हे काम निश्चितपणे पूर्णत्वास जाईल. या कामासाठी नगरपालिका आणि आमदार राणाजगजीतसिंह पाटील यांचे सर्वतोपरी सहकार्य लाभेल. तसेच आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याचाही प्रयत्न केला जाईल, असे त्यांनी सांगितले. काशी विश्वनाथ मंदिराकडून दरवर्षी श्री तुळजाभवानी मंदिरासाठी मानाचे महावस्त्र पाठविण्याबाबत प्रयत्न व्हावेत, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. यावेळी गहिनीनाथ महाराज औसेकर आणि आमदार विजयकुमार देशमुख यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास होटगी संस्थानचे सचिव शांतया स्वामी, संचालक शशिकांत रामपुरे, शिवानंद पाटील, संगप्पा महमाने, केदार उंबरजे, श्रीशैल अंबारे, विजय कंदले, मधुकर शेळके, आनंद कंदले, गुलचंद व्यवहारे, सागर कदम, अनंत कोंडो, ॲड. गिरीश शेटे, प्रफुल मस्के, महाबळेश्वर तोडकरी, भारत कोप्पा, लक्ष्मण उळेकर, महेश नडमने, अभिषेक कोरे, विश्वनाथ शेटे, अस्मिता शेटे, गौरीशंकर साखरे, राजकुमार बुट्टे यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमातील धार्मिक विधी परमेश्वर शास्त्री यांनी पार पाडले. कार्यक्रमानंतर जगद्गुरू डॉ. मल्लिकार्जुन महास्वामी यांनी पायी चालत जाऊन श्री तुळजाभवानी मातेचे दर्शन घेतले. तत्पूर्वी श्रीशैल पीठाचे जगद्गुरू डॉ. चन्नसिद्धाराम यांनी जंगम मठास भेट देऊन देवीचे दर्शन घेतले.



## लाडक्या नातवांकडून आजोबांचा वाढदिवस उत्साहात



राज्याचे माजी गृहमंत्री व ज्येष्ठ नेते डॉ. पद्मसिंह पाटील यांचा वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला. त्यांचे लाडके नातू युवा नेते मल्हार पाटील आणि मेघ पाटील यांनी मुंबईतील निवासस्थानी केक वाढवून आजोबांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी आमदार राणा जगजितसिंह पाटील, जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा अर्चनाताई पाटील, पृथ्वीराज पाटील यांच्यासह कुटुंबीय उपस्थित होते. वाढदिवसानंतर मल्हार पाटील यांनी सोशल मीडियावर भावनिक पोस्ट शेअर करत, जीवनात काही क्षण असे असतात, जे शब्दांत व्यक्त करता येत नाहीत; ते फक्त मनात जपून ठेवावे लागतात,असे म्हटले आहे.

# शेतकरी आणि तरुणांच्या प्रश्नांसाठी विधान परिषदेत आवाज उठविणार

## महाविकास आघाडीचे उमेदवार महेश देशमुख यांना विजयाचा विश्वास

### विकास आणि जनहिताच्या मुद्द्यांवर भर देणार असल्याची पत्रकार परिषदेत माहिती




आरंभ मराठी । धाराशिव

धाराशिव-बीड-लातूर स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीसाठी महाविकास आघाडीचे उमेदवार महेश देशमुख यांनी सोमवारी उमेदवारी अर्ज दाखल केला. यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी शेतकरी, तरुण, विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांना प्राधान्य देण्याची ग्वाही देत ही निवडणूक जनतेच्या हक्कांसाठीची लढाई असल्याचे स्पष्ट केले. महाराष्ट्राच्या राजकारणाला नवी दिशा देणारे माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांना अभिवादन करून महेश देशमुख यांनी आपल्या मनोगताची सुरुवात केली. राज्यात आणि देशात अराजकतेचे राजकारण सुरू असून गोरगरीब, कष्टकरी, शेतकरी आणि विद्यार्थ्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप त्यांनी केला. पेपरफुटीसारख्या गंभीर घटनांमुळे तरुणांच्या भवितव्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून अशा प्रश्नांवर प्रभावीपणे आवाज उठविण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बोलताना देशमुख म्हणाले की, महाविकास आघाडीचे संख्याबळ तुलनेने कमी असले तरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे मतदार हे सुशिक्षित, जागरूक आणि परिस्थितीचा योग्य विचार करून मतदान करणारे आहेत. त्यामुळे या निवडणुकीत विचार, विकास आणि जनहिताचे मुद्दे निर्णायक ठरणार आहेत. उमेदवारी मिळेल अशी अपेक्षा नसतानाही पक्षाने दाखविलेला विश्वास सार्थ ठरविण्यासाठी पूर्ण ताकदीने निवडणूक लढविणार असल्याचे त्यांनी सांगितले. माजी मंत्री अमित देशमुख, माजी आमदार धीरज देशमुख तसेच महाविकास आघाडीतील सर्व घटक पक्षांच्या नेतृत्वाखाली ही निवडणूक लढविली जाणार असून विजयाचा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. निवडून आल्यानंतर शेतकरी, युवक आणि विद्यार्थ्यांच्या मूलभूत हक्कांसाठी सातत्याने संघर्ष करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. जलजीवन मिशनसह विविध मूलभूत सुविधांच्या प्रश्नांवर आपण सातत्याने आवाज उठविला असून समान निधी वाटपासाठीही प्रयत्नशील राहिलो असल्याचे देशमुख यांनी सांगितले. विकासकामांच्या अंमलबजावणीत प्रादेशिक समतोल राखण्यासाठी विधान परिषदेत प्रभावी भूमिका बजावण्याचे आश्वासन त्यांनी दिले. यावेळी धाराशिव जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष उमेश राजे निंबाळकर यांनी राज्य सरकारवर टीका करत वाढती महागाई, बेरोजगारी आणि जनतेच्या प्रश्नांकडे होत असलेल्या दुर्लक्षाविरोधात ही निवडणूक महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे सांगितले. महागाईच्या झळा सर्वसामान्य नागरिकांना बसत असून जनतेच्या प्रश्नांसाठी महाविकास आघाडी कटिबद्ध असल्याचा पुनरुच्चार त्यांनी केला. पत्रकार परिषदेला महाविकास आघाडीतील विविध पक्षांचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कावळेवाडी येथे पशुपालन विषयक एकदिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद



आरंभ मराठी । पळसप

धाराशिव तालुक्यातील कावळेवाडी येथे शिवसंकेत ॲग्रोटेक फार्मर प्रोड्युसर कंपनी लिमिटेडच्या वतीने पशुपालन क्षेत्रातील विविध विषयांवर आधारित एकदिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. महाराष्ट्रातील विविध भागांतून आलेल्या पशुपालक व शेतकऱ्यांनी या कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. कार्यशाळेमध्ये शेळीपालन, चारा व्यवस्थापन, कुक्कुटपालन, गाई-म्हैस पालन, मुरघास निर्मिती तसेच मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. शेळीपालन विषयाचे प्रमुख मार्गदर्शक मुकुंद पालकर यांनी आधुनिक शेळीपालन तंत्रज्ञान, आरोग्य व्यवस्थापन आणि उत्पादनवाढीसाठी आवश्यक बाबींवर मार्गदर्शन केले. यावेळी शिवसंकेत गोट फार्मचे अध्यक्ष गोविंद लोमटे यांनी मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेची माहिती देत अर्ज प्रक्रिया, पात्रता निकष आणि अनुदानाच्या बाबी उपस्थितांसमोर स्पष्ट केल्या. कार्यक्रमास कावळेवाडीचे सरपंच ॲड. अजित खोत, शिवसंकेत गोट फार्मचे संचालक महेश कावळे, ग्रामपंचायत सदस्य हनुमंत कावळे व शशिकांत कावळे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच पळसप येथील प्रगतशील शेतकरी व बळीराजा हायटेक नर्सरीचे संचालक रमेश नरवडे, नवउद्योजक किरण पवार, अतुल शिंदे, सीआरपी अश्विनी कावळे, अलका कावळे, बुकन मॅडम तसेच विविध गावांतील सीआरपी कार्यकर्त्या आणि बचत गटातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. महाराष्ट्रातील विविध भागांतून आलेल्या पशुपालकांचा या कार्यशाळेला उत्तम प्रतिसाद मिळाल्याचे गोविंद लोमटे यांनी सांगितले. आधुनिक पशुपालन व्यवसायाला चालना देणारी आणि पशुपालकांसाठी मार्गदर्शक ठरणारी ही कार्यशाळा यशस्वीरीत्या पार पडल्याचे उपस्थितांनी नमूद केले.

## छत्रपती शिवाजी महाराज जीवन गौरव पुरस्कार मिळाल्याबद्दल शहाजी पाटील यांचा सत्कार



आरंभ मराठी । शिराढोण

समाजसेवा, शिक्षण, आरोग्य आणि सर्वसामान्यांच्या मदतीसाठी आयुष्यभर कार्यरत राहिलेल्या माजी जिल्हा परिषद सदस्य शहाजी दादा पाटील यांना अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेचा मानाचा ‘छत्रपती शिवाजी महाराज जीवन गौरव पुरस्कार‘ प्राप्त झाल्याबद्दल ग्रामपंचायत कार्यालय शिराढोणच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, प्रतिष्ठित नागरिक तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी शहाजी दादा पाटील यांच्या समाजहिताच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या लोकाभिमुख नेतृत्वाची प्रशंसा केली. शिराढोण गावाचे नाव महाराष्ट्रभर पोहोचविण्यात शहाजी दादा पाटील यांचे मोठे योगदान आहे. वैद्यकीय अडचणीच्या काळात अनेक गरजू कुटुंबांना मदतीचा हात देणे, विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन देणे, वंचित घटकांच्या उन्नतीसाठी कार्य करणे तसेच गावातील सामाजिक सलोखा टिकवून ठेवण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणे, ही त्यांच्या कार्याची वैशिष्ट्ये असल्याचे यावेळी वक्त्यांनी नमूद केले. गोरगरीब आणि गरजूंना कायम आधार देणारे व्यक्तिमत्त्व म्हणून शहाजी दादा पाटील यांची ओळख आहे. गावातील अनेक कुटुंबांच्या सुख-दुःखात सहभागी होत त्यांनी जपलेला जनसंपर्क आणि आपुलकी यामुळे ते सर्वांचेच लाडके बनले आहेत. सत्काराला उत्तर देताना शहाजी दादा पाटील यांनी हा सन्मान केवळ त्यांचा नसून संपूर्ण शिराढोण गावाचा असल्याचे सांगितले. भविष्यातही समाजकार्यासाठी आपले योगदान कायम राहील, अशी भावना त्यांनी यावेळी व्यक्त केली.

# पहाटे ३ पर्यंत रंगला व्हॉलीबॉलचा थरार!

## कळंबच्या इतिहासातील सर्वात भव्य राज्यस्तरीय मुलींच्या व्हॉलीबॉल स्पर्धेचा उत्साहात समारोप , पुणे संघ प्रथम

आरंभ मराठी । कळंब

स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त संकल्प व्हॉलीबॉल क्लब व फ्रेंड्स फॉरएव्हर फाउंडेशन, कळंब यांच्या संयुक्त विद्यमाने व शिवसेना जिल्हाप्रमुख अजित पिंगळे यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय मुलींच्या भव्य व्हॉलीबॉल स्पर्धेने कळंबच्या क्रीडा इतिहासात नवा विक्रम प्रस्थापित केला. प्रथमच इतक्या मोठ्या प्रमाणावर आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेला राज्यभरातील खेळाडू आणि क्रीडारसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या स्पर्धा दिनांक 29 ते 31 मे या दरम्यान पार पडल्या. मुंबई, पुणे, छत्रपती संभाजीनगर, बारामती, सोलापूर आणि लातूरसह राज्यातील विविध भागांतील १४ नामांकित मुलींच्या संघांनी स्पर्धेत सहभाग नोंदविला.

राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळलेल्या अनेक खेळाडूंच्या उपस्थितीमुळे स्पर्धेला विशेष उंची प्राप्त झाली. तीन दिवस चाललेल्या या स्पर्धेतील प्रत्येक सामना अटीतटीचा आणि चित्तथरारक ठरला. अंतिम फेरीतील रोमांचक लढती पाहण्यासाठी क्रीडारसिकांनी पहाटे तीन वाजेपर्यंत मैदानावर ठाण मांडून व्हॉलीबॉलचा थरार अनुभवला. अंतिम सामन्यात पुण्याच्या मिलेनियम संघाने आपल्या उत्कृष्ट सांघिक खेळाच्या जोरावर विजेतेपद पटकावले. संघातील श्रेया हिने अचूक सर्व्हिस, दमदार स्मॅश आणि आक्रमक खेळाच्या बळावर संपूर्ण स्पर्धेत आपली वेगळी छाप उमटवली. तिच्या खेळाला प्रेक्षकांकडून उत्स्फूर्त दाद मिळाली.स्पर्धेत मिलेनियम, पुणे संघाने प्रथम, लातूर स्पायकर्स ‘बी’ संघाने द्वितीय, लातूर स्पायकर्स ‘ए’ संघाने तृतीय तर मुंबई पोलिस संघाने चतुर्थ क्रमांक पटकावला. विजेत्या संघांना चषक, सन्मानचिन्ह आणि रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.महिला सक्षमीकरणाचा अनोखा संदेश देत सर्व प्रमुख पारितोषिके महिला लोकप्रतिनिधींच्या वतीने ठेवण्यात आली. जिल्हा परिषद अध्यक्षा सौ. अर्चनाताई राणाजगजीतसिंह पाटील यांच्या वतीने ५१ हजार रुपयांचे प्रथम, जिल्हा परिषद उपाध्यक्षा सौ. उषाताई रविंद्र गायकवाड यांच्या वतीने ३१ हजार रुपयांचे द्वितीय, महिला व बालकल्याण सभापती सौ. पूजा तुषार शिंदे यांच्या वतीने २१ हजार रुपयांचे तृतीय तसेच कळंब पंचायत समितीच्या सभापती सौ. राजश्रीताई वरपे यांच्या वतीने ११ हजार रुपयांचे चतुर्थ पारितोषिक देण्यात आले. महिलांच्या माध्यमातून महिलांसाठी आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेचे सर्वत्र कौतुक झाले.




### अजित पिंगळे म्हणाले,भव्य स्पर्धा घेणार

कळंबच्या इतिहासात प्रथमच इतक्या भव्य स्वरूपात मुलींची राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धा आयोजित करण्यात आली. ग्रामीण भागातील मुलींना मोठे व्यासपीठ मिळावे आणि क्रीडा संस्कृतीला चालना मिळावी हा या उपक्रमामागील उद्देश होता. राज्यभरातील संघांचा सहभाग आणि क्रीडारसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता भविष्यात यापेक्षाही मोठ्या स्पर्धांचे आयोजन करण्यात येईल,असे अजित पिंगळे म्हणाले. बक्षीस वितरण सोहळ्यास अजित पिंगळे, संकल्प व्हॉलीबॉल क्लबचे रतन उबाळे, तुषार शिंदे, क्रीडामहर्षी लक्ष्मण मोहिते, फ्रेंड्स फॉरएव्हर फाउंडेशनचे डॉ. अभिजित लोंढे, गोपाळ उबाळे, राहुल कवडे,प्रा. जगदीश गवळी, परमेश्वर पालकर, उदय खंडागळे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. कळंबच्या क्रीडा इतिहासात दीर्घकाळ स्मरणात राहील असा हा भव्य क्रीडा महोत्सव ठरला.या स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी संकल्प व्हॉलीबॉल क्लब, फ्रेंड्स फोरएव्हर फाउंडेशन, अजित दादा पिंगळे युवा मंच यांनी परिश्रम घेतले

### विजेते संघ

प्रथम – मिलेनियम, पुणे (५१,०००)
द्वितीय– लातूर स्पायकर्स ‘बी’ (३१,०००)
तृतीय– लातूर स्पायकर्स ‘ए’ (२१,०००)
चतुर्थ – मुंबई पोलिस (११,०००)

### महिलांच्या नेतृत्वातून महिलांना प्रोत्साहन

धाराशिव जिल्हा परिषद आणि पंचायत समितीमध्ये महिलांचे नेतृत्व प्रभावीपणे कार्यरत असताना महिला खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी महिला लोकप्रतिनिधींच्याच माध्यमातून पारितोषिके देण्यात आली. त्यामुळे या स्पर्धेला सामाजिक बांधिलकीची वेगळी ओळख प्राप्त झाली. यासाठी भाजपचे युवा नेते मल्हार दादा पाटील यांचे मोलाचे सहकार्य लाभल्याची माहिती शिवसेना जिल्हाप्रमुख अजित पिंगळे यांनी दिली.

आरंभ मराठी

## विद्यार्थ्यांना ऑनलाइन अर्ज करण्याचे आवाहन

# परंडा येथील शासकीय आयटीआयमध्ये प्रवेश प्रक्रिया सुरु

आरंभ मराठी । परंडा

कल्याणस्वामी महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय), परंडा येथे केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेअंतर्गत प्रवेशासाठी अर्ज भरण्याची प्रक्रिया २१ मेपासून सुरू झाली असून, पहिल्या प्रवेश फेरीसाठी व्यवसाय व संस्थानिहाय प्राधान्यक्रम सादर करण्याची सुविधा १ जूनपासून उपलब्ध करून देण्यात येणार आहे, अशी माहिती संस्थेचे प्राचार्य केशव पवार यांनी दिली. संस्थेमध्ये एकूण तीन व्यवसायांसाठी ६० जागा उपलब्ध आहेत. यामध्ये अभियांत्रिकी गटातील इलेक्ट्रिशियन व वेल्डर, तसेच बिगर-अभियांत्रिकी गटातील ड्रेसमेकिंग या व्यवसायांचा समावेश आहे. प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेबाबत मार्गदर्शन मिळावे यासाठी २१ मेपासून संस्थेमध्ये निःशुल्क मार्गदर्शन सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. कल्याणस्वामी महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, परंडा येथील संलग्न व्यवसाय अभ्यासक्रमांच्या तुकड्यांची माहिती https:// admission.dvet.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी संकेतस्थळावर जाऊन ऑनलाइन नोंदणी करून प्रवेश प्रक्रियेत सहभागी व्हावे, असे आवाहन प्राचार्य केशव पवार यांनी केले आहे.



### प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक

**ऑनलाइन प्रवेश अर्ज भरणे, अर्जात दुरुस्ती करणे व शुल्क भरणे : २१ मेपासून सुरू**
**अर्ज निश्चित करणे व मूळ कागदपत्रांची पडताळणी : २१ मेपासून सुरू**
**पहिल्या प्रवेश फेरीसाठी व्यवसाय व संस्थानिहाय विकल्प व प्राधान्यक्रम सादर करणे : १ जूनपासून**

# एसटीच्या ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त अणदूर बसस्थानकात विशेष कार्यक्रम

आरंभ मराठी । अणदूर



राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त अणदूर बसस्थानकात उत्साहपूर्ण वातावरणात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. वर्धापन दिनानिमित्त ग्रामपंचायत सदस्य तथा सामाजिक कार्यकर्ते बालाजी घुगे यांच्या हस्ते वाहतूक नियंत्रक कार्यालय व बसचे पूजन करण्यात आले. यानंतर उपस्थितांच्या साक्षीने वर्धापन दिन साजरा करण्यात आला. यावेळी बोलताना बालाजी घुगे म्हणाले की, सुरक्षित सेवा आणि विश्वासाची परंपरा एसटी महामंडळाने अनेक वर्षांपासून जपली आहे. सर्वसामान्य जनतेची नाळ ‘लालपरी’शी जोडली गेली असून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचणारी ही सेवा खऱ्या अर्थाने जनजीवनाची वाहिनी आहे. राज्यभरातील बसस्थानके आणि आगारांमध्ये आज वर्धापन दिन साजरा होत असून अणदूर बसस्थानकात प्रवाशांच्या साक्षीने हा सोहळा साजरा करताना आनंद होत आहे. या कार्यक्रमास उमरगा आगाराचे वाहतूक नियंत्रक अतुल बारभाई, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष कल्याणी मुळे, पत्रकार राजकुमार स्वामी, गुरुनाथ कबाडे, बसवेश्वर नरे, वाहतूक नियंत्रक चव्हाण, सुरेश तोडकरी, मल्लिनाथ लंगडे, संजय करपे, आजीबाल गायकवाड, बाबा तांबोळे, अतुल घोंगडे, खंडू व्हनाळे तसेच रिक्षा संघटनेचे कार्यकर्ते उपस्थित होते. एसटी महामंडळाच्या गौरवशाली परंपरेला उजाळा देत अणदूर बसस्थानकात वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

हे पत्र मालक, मुद्रक, संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी,गवळी वाडा धाराशिव, ता. जि. धाराशिव, येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव)
संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८० RNI NO.-2023/90078 कार्यालय; सुकर्मा कॅपिटल, बार्शी नाका, जिजाऊ चौक, धाराशिव-४१३५०१.मो. ९४२२०६८४२२. This letter was published by owner, printer, editor Chandrasen Govindrao Deshmukh, printed at Aadesh Printers, Ramkrishna Colony, Gawli Wada Dharashiv, Ta. Dist. Dharashiv, and published at Ramkrishna Colony, Gawli Wada, Dharashiv (Maharashtra).
»पुणे कार्यालयः1012,विंग B, पूर्वांचल,विबग्योर स्कुलशेजारी » कोल्हापूर कार्यालयः रिव्हॉल्युशन, दुसरा मजला, दाभोळकर कॉर्नर, स्टेशन रोड, करवीर.

दिव्यांग मुलींच्या कौशल्याचा अनोखा अविष्कार; संस्थेच्या कार्याचे आयुक्त बडे यांच्याकडून कौतुक

# लेझिम-गीतांनी आयुक्तांचे स्वागत; स्वाधारच्या नियोजनाने अधिकारी भारावले

**आरंभ मराठी । धाराशिव**



तालुक्यातील आळणी येथील स्वाधार मतिमंद मुलींच्या बालगृहात दिव्यांग सक्षमीकरण आयुक्त सत्यजित बडे (भा.प्र.से.) यांच्या स्वागतासाठी मुलींनी लेझिम पथक, गायन आणि विविध सांस्कृतिक सादरीकरणांद्वारे आपल्या कौशल्याचा अनोखा आविष्कार घडवून आणला. मुलींचा आत्मविश्वास, संस्थेतील शिस्तबद्ध नियोजन आणि सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणारे उपक्रम पाहून आयुक्त भारावून गेले. दिव्यांग सक्षमीकरण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे नवनियुक्त आयुक्त सत्यजित बडे यांनी तुळजाई प्रतिष्ठान बहुउद्देशीय संस्था, पानगाव संचलित स्वआधार मतिमंद मुलींचे बालगृह, आळणी येथे भेट देत संस्थेच्या विविध उपक्रमांचा सविस्तर आढावा घेतला.

पदभार स्वीकारल्यानंतरच्या महत्त्वाच्या दौऱ्यांपैकी या संस्थेची निवड करून त्यांनी ग्रामीण भागातील विशेष शिक्षण व पुनर्वसन व्यवस्थेची प्रत्यक्ष माहिती घेतली. भेटीदरम्यान आयुक्तांनी बालगृहातील निवासी मुलींचे संगोपन, आरोग्य सुविधा, उपचार व्यवस्था, पुनर्वसन प्रक्रिया, शैक्षणिक प्रगती तसेच विविध शासकीय योजनांच्या अंमलबजावणीची माहिती जाणून घेतली.

मतिमंद, बहुविकलांग आणि विशेष गरजा असलेल्या मुलींच्या सर्वांगीण विकासासाठी संस्था राबवत असलेल्या उपक्रमांचे त्यांनी कौतुक केले. यावेळी बालगृह, विशेष शाळा आणि कार्यशाळा या तीनही विभागांची पाहणी करण्यात आली. मुलींसाठी सुरू असलेले कौशल्य विकास प्रशिक्षण, व्यावसायिक अभ्यासक्रम, फाईल मेकिंग वर्कशॉप, पार्लर प्रशिक्षण आणि स्वावलंबनासाठीचे उपक्रम पाहून आयुक्तांनी समाधान व्यक्त केले. विशेष गरजा असलेल्या मुलींना रोजगाराभिमुख प्रशिक्षण देण्याचा संस्थेचा प्रयत्न प्रेरणादायी असल्याचे त्यांनी नमूद केले. स्पेशल ऑलिम्पिक्सच्या राष्ट्रीय स्पर्धेत संस्थेतील दोन मुलींनी महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करत सुवर्णपदक पटकाविल्याची माहिती मिळाल्यानंतर आयुक्तांनी विशेष आनंद व्यक्त केला. योग्य प्रशिक्षण आणि संधी मिळाल्यास विशेष मुली राष्ट्रीय स्तरावरही उल्लेखनीय कामगिरी करू शकतात, असे त्यांनी सांगितले. संस्थेत सुरू करण्यात आलेल्या 'स्वआधार क्लिनिक'चीही त्यांनी पाहणी केली. नियमित आरोग्य तपासणी, औषधोपचारांचे नियोजन आणि आपत्कालीन वैद्यकीय सेवेसाठी करण्यात आलेल्या या उपक्रमाची दखल घेत त्यांनी संस्थेच्या दूरदृष्टीपूर्ण नियोजनाचे कौतुक केले. संस्थेने ९१ मुलींचे कायदेशीर पालकत्व स्वीकारून त्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी केलेल्या प्रयत्नांची माहितीही यावेळी देण्यात आली. निरामय आरोग्य विमा योजना, मनोधैर्य योजना आणि इतर पुनर्वसन उपक्रमांमुळे अनेक मुलींच्या जीवनात सकारात्मक बदल घडल्याचे आयुक्तांनी नमूद केले. लैंगिक अत्याचारग्रस्त, न्यायप्रविष्ट आणि विशेष संरक्षणाची गरज असलेल्या मुलींसाठी संस्था करत असलेल्या संवेदनशील कार्याची माहिती घेताना त्यांनी संस्थेच्या मानवतावादी दृष्टिकोनाचे कौतुक केले. न्यायालयीन प्रक्रियेत मदत, समुपदेशन आणि पुनर्वसनासाठी करण्यात येणारे कार्य उल्लेखनीय असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी संस्थेचे सचिव शहाजी चव्हाण, मुख्याध्यापक गुरुनाथ थोडसरे, दिव्यांग सक्षमीकरण विभागाचे अधिकारी तसेच विविध दिव्यांग शाळांचे मुख्याध्यापक उपस्थित होते.

## दाळींब येथे लोकमाता अहिल्यादेवी होळकर यांची जयंती उत्साहात साजरी



**आरंभ मराठी । दाळींब**

उमरगा तालुक्यातील दाळींब येथील ग्रामपंचायत कार्यालयात रविवारी (दि. ३१) लोकमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. यावेळी सरपंच परशुराम लिंबाजी देवकते यांच्या हस्ते अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या कार्याचा गौरव करत समाजासाठी दिलेल्या योगदानाचे स्मरण केले. कार्यक्रमास माजी सरपंच रंजना सातपुते, माजी उपसरपंच हिराजी गायकवाड, ओमप्रकाश टिकांबरे, दयानंद देवकते, बालाजी सातपुते, सरफराज चाकुरे, सुभाष राठोड, हुसेन शेख, सुमित जाधव, बाळू आर्जुनकर आदी उपस्थित होते.

## प्रा. भालचंद्र बिराजदार सेवानिवृत्त; शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय सेवेला सलाम



**अणदूर** :- शिक्षण प्रसारक मंडळ, अणदूरचे मार्गदर्शक तथा सीओईपी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे येथील स्थापत्य अभियांत्रिकी विभागाचे माजी विभागप्रमुख प्रा. भालचंद्र बिराजदार हे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले.प्रा. बिराजदार यांनी सीओईपीमध्ये प्रभावी अध्यापन, प्रशासकीय जबाबदाऱ्या आणि विविध विकासकामांद्वारे उल्लेखनीय योगदान दिले. शिक्षण प्रसारक मंडळ, अणदूरच्या शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांमध्येही त्यांनी मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य केले. त्यांच्या पुढाकारातून जवाहर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात विद्यार्थ्यांसाठी सुमारे १९ लाख रुपयांच्या स्वच्छतागृह सुविधेची उभारणी करण्यात आली. शैक्षणिक तळमळ, सामाजिक बांधिलकी आणि साधेपणासाठी ओळख असलेल्या प्रा. भालचंद्र बिराजदार यांना संस्थेसह ग्रामस्थांनी सेवानिवृत्तीच्या शुभेच्छा देत त्यांच्या पुढील आयुष्यासाठी निरोगी, सुखी व समाधानमय जीवनाच्या शुभेच्छा दिल्या.

## नळदुर्ग येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती उत्साहात साजरी

### अहिल्यादेवी चौकात भव्य सभामंडप उभारण्याची नगराध्यक्ष बसवराज धरणे यांची घोषणा

**आरंभ मराठी । नळदुर्ग**



नळदुर्ग शहरातील राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौकात येत्या वर्षभरात भव्य सभामंडप उभारण्यात येणार असल्याची घोषणा नगराध्यक्ष बसवराज धरणे यांनी केली. राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर मध्यवर्ती जन्मोत्सव समितीच्या वतीने ३१ मे रोजी नळदुर्ग येथे जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त शहरात विविध ठिकाणी अभिवादन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. नळदुर्ग बसस्थानकात भीमाशंकर बताले यांच्या वतीने जयंती कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी वाहतूक नियंत्रक महेश डुकरे यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. तसेच नगरपालिका कार्यालयात नगराध्यक्ष बसवराज धरणे यांच्या हस्ते अहिल्यादेवींच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. जयंतीचा मुख्य कार्यक्रम राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौकात पार पडला. यावेळी नगराध्यक्ष बसवराज धरणे आणि काँग्रेसचे गटनेते मारुती खारवे यांच्या हस्ते अहिल्यादेवींच्या पुतळ्याचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमास नगरसेवक दत्तात्रय दासकर, तानाजी जाधव, सुधीर पोतदार, ॲड. अरविंद बेडगे, माजी नगरसेवक सुधीर हजारे, विनायक अहंकारी, भाजयुमोचे जिल्हा सरचिटणीस श्रमिक पोतदार, मनसेचे जिल्हा सरचिटणीस ज्योतिबा येडगे, भोई समाजाचे शहराध्यक्ष सुनील उकंडे, शहर ब्राह्मण समाज संघटनेचे अध्यक्ष मुकुंद नाईक, बबन चौधरी, धीमाजी घुगे, पप्पू पाटील, उत्तम बनजगोळे, भगवंत सुरवसे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलताना नगराध्यक्ष बसवराज धरणे यांनी अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या आदर्शातून प्रेरणा घेण्याची गरज व्यक्त केली. देशभरातील हिंदू मंदिरांचा जीर्णोद्धार, विहिरी व घाटांची उभारणी तसेच धार्मिक आणि पर्यावरण संवर्धनासाठी त्यांनी केलेले कार्य आजही प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले. समितीच्या मागणीनुसार अहिल्यादेवी चौकात त्यांच्या कार्याला साजेसा भव्य सभामंडप उभारण्यात येईल, असे आश्वासन त्यांनी दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन ज्ञानेश्वर घोडके यांनी केले.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त 31 रक्तदात्यांचे रक्तदान



**आरंभ मराठी । शिराढोण**

सौंदना (अंबा), ता. कळंब येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या 301 व्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सामाजिक बांधिलकी जपत आणि रक्ताला कोणताही पर्याय उपलब्ध नसल्याची जाणीव ठेवून गावातील तरुणांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत रक्तदानाचा संकल्प पूर्ण केला. या शिबिरात एकूण 31 जणांनी रक्तदान केले. हे रक्तदान शिबिर रेणुका रक्तपेढी, धाराशिव यांच्या सहकार्याने यशस्वीपणे पार पडले. शिबिरामध्ये इसाक शेख, धनेश्वर पालकर, लक्ष्मण भिसे, शरद भिसे, कुलदीप गायकवाड, खंडू देवकते, बिरुदेव थाटकर, दिगंबर डाके, बळीराम देवकते, सतीश देवकते, गणेश गायकवाड, दत्ता गायकवाड आदींनी रक्तदान करून समाजाप्रती आपली जबाबदारी पार पाडली.शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी लक्ष्मण देवकते, सुरज देवकते, दिलीप देवकते, महेंद्र देवकते, विष्णू गाडेकर, कैलास काळे, विलास पालकर, स्वप्नील देवकते, विठ्ठल देवकते, महेश काळे, माधव देवकते आदींनी विशेष परिश्रम घेतले. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाचे परिसरातून कौतुक होत असून, समाजोपयोगी कार्यातून जयंती साजरी करण्याचा आदर्श या निमित्ताने तरुणांनी घालून दिला आहे.

## पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर जयंतीनिमित्त स्वधार बालगृहातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व खाऊचे वाटप

**आरंभ मराठी । धाराशिव**



लो क क ल या ण का री राज्यकारभाराचा आदर्श निर्माण करणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या 301 व्या जयंतीनिमित्त धाराशिव सेवकच्या वतीने मतिमंद स्वधार बालगृह, धाराशिव येथे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व बिस्किटांचे वाटप करून जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी सर्वप्रथम पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. समाजाप्रती असलेली बांधिलकी जपत राबविण्यात आलेल्या या उपक्रमातून बालगृहातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वितरण करून त्यांना प्रोत्साहन देण्यात आले. सामाजिक कार्यकर्ते गणेश वाघमारे यांनी मनोगत व्यक्त करताना बालगृहातील सुव्यवस्था, मतिमंद मुलांची सुरक्षा, स्वच्छता आणि इतर सुविधांची पाहणी करून संचालक मंडळ, शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या कार्याचे कौतुक केले. तसेच त्यांनी सर्वांना शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमास धाराशिव सेवकचे संस्थापक अध्यक्ष विवेक यादव, सामाजिक कार्यकर्ते तथा तालुकास्तरीय बाल संरक्षण समिती सदस्य गणेश वाघमारे, भगतसिंग अभ्यासिकेचे विजय राठोड, दिनेश देवकते, प्रकाश चव्हाण तसेच शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.

## अकबर मुलानी यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन

**आरंभ मराठी । तेर**



तेर (ता. धाराशिव) येथील अकबर लियाकत मुलानी यांचे शनिवारी (दि. ३०) हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. ते ४१ वर्षांचे होते. त्यांच्या निधनामुळे तेर परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. रविवारी तेर येथे त्यांच्यावर दफनविधी करण्यात आला. अकबर मुलानी यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी आणि तीन मुले असा परिवार आहे. ते पत्रकार इर्शाद मुलानी यांचे मोठे बंधू होते. त्यांच्या अकाली निधनाने कुटुंबीयांसह मित्रपरिवार आणि परिसरातील नागरिकांमध्ये शोककळा पसरली आहे.

आरंभ मराठी — ५ व ६ जून रोजी दुर्गराज रायगडावर भव्य शिवराज्याभिषेक महोत्सव; ऐतिहासिक वैभव अनुभवण्याची संधी

# रायगडावरील शिवराज्याभिषेक सोहळ्याचे साक्षीदार व्हा; धाराशिव जिल्ह्यातील शिवभक्तांना आवाहन

**आरंभ मराठी । तुळजापूर**



छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाचा ऐतिहासिक आणि प्रेरणादायी सोहळा यंदाही दुर्गराज रायगडावर मोठ्या उत्साहात साजरा होत असून, या अविस्मरणीय क्षणाचे साक्षीदार होण्यासाठी धाराशिव जिल्ह्यातील शिवभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन स्वराज्य संघटना धाराशिव जिल्हाध्यक्ष महेश गवळी यांनी केले. तुळजापूर येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी मराठवाडा प्रवक्ते जीवन इंगळे, पुजारी नगर फाऊंडेशनचे अध्यक्ष गणेश पुजारी, सोहळा समितीचे मानकरी सतीश खोपडे, सत्यजित साठे, नागेश लोखंडे आदी उपस्थित होते. महेश गवळी यांनी सांगितले की, अखिल भारतीय शिवराज्याभिषेक महोत्सव समितीच्या माध्यमातून गेल्या अनेक वर्षांपासून रायगडावर शिवराज्याभिषेक सोहळ्याचे भव्य आयोजन केले जात आहे. या सोहळ्यासाठी सुमारे ४० विविध आघाड्यांवर काम सुरू असून हजारो स्वयंसेवक जबाबदारीने सेवा बजावत आहेत. यंदाच्या सोहळ्याची प्राथमिक तयारी १ मेपासूनच सुरू करण्यात आली आहे. 'जय भवानी, जय शिवाजी' या घोषवाक्याप्रमाणे स्वराज्याची स्वतंत्र ओळख आणि इतिहास जपण्याचा प्रयत्न या महोत्सवातून केला जातो. रायगडावरील हा मान केवळ एका व्यक्तीचा नसून संपूर्ण महाराष्ट्राच्या स्वाभिमानाचे प्रतीक असल्याचे त्यांनी नमूद केले. विशेष म्हणजे तुळजापूरच्या कुंकूवाला रायगडी मान मिळत असून, हा तुळजापूरकरांसाठी अभिमानाचा विषय असल्याचेही त्यांनी सांगितले. सन २०१७ पासून रायगडावर साडी व कवड्यांची माळ अर्पण करण्याची परंपरा सुरू असून, यंदाही ही परंपरा भक्तिभावाने पार पाडली जाणार आहे. या सोहळ्यामुळे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि धार्मिक परंपरांचे संवर्धन होत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. अखिल भारतीय शिवराज्याभिषेक महोत्सव समिती, दुर्गराज रायगड यांच्या वतीने ५ व ६ जून २०२६ रोजी शिवराज्याभिषेक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यास समितीचे मार्गदर्शक युवराज संभाजीराजे छत्रपती, युवराज्ञी संयोगिताराजे छत्रपती तसेच युवराजकुमार शहाजीराजे छत्रपती यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. यंदाच्या महोत्सवात 'धार तलवारीची, युद्धकला महाराष्ट्राची', 'जागर शिवशाहिरांचा... स्वराज्याच्या इतिहासाचा' आणि 'सोहळा पालखीचा, स्वराज्याच्या ऐक्याचा' हे विशेष कार्यक्रम आकर्षणाचे केंद्र ठरणार आहेत. शिवकालीन परंपरा, युद्धकला, शिवशाहिरांचे सादरीकरण तसेच स्वराज्याच्या वैभवाचे दर्शन घडविणारे विविध उपक्रम यावेळी आयोजित करण्यात येणार आहेत. धाराशिव जिल्ह्यातील शिवप्रेमी, इतिहासप्रेमी आणि युवकांनी मोठ्या संख्येने रायगडावर उपस्थित राहून या ऐतिहासिक सोहळ्याचे साक्षीदार व्हावे, असे आवाहन महेश गवळी यांनी केले.

## डॉ. नितीन पडवळ यांची पर्यावरण समितीवर सदस्यपदी निवड

### शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातून अभिनंदनाचा वर्षाव

**आरंभ मराठी । भूम**



विद्या विकास मंडळ, पाथरूड संचलित शंकरराव पाटील महाविद्यालय, भूम येथील प्राणीशास्त्र विभागाचे प्रमुख व प्राध्यापक डॉ. नितीन पडवळ यांची धाराशिव जिल्हा पर्यावरण समितीवर सदस्य म्हणून निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीमुळे शैक्षणिक व पर्यावरण क्षेत्रात समाधान व्यक्त करण्यात येत आहे. डॉ. पडवळ हे शंकरराव पाटील महाविद्यालयात प्राणीशास्त्र विभाग प्रमुख म्हणून कार्यरत असून, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगरच्या प्राणीशास्त्र अभ्यास मंडळाचे सदस्य म्हणूनही ते जबाबदारी सांभाळत आहेत. पर्यावरण, जैवविविधता व संशोधन क्षेत्रातील त्यांच्या कार्याची दखल घेत ही निवड करण्यात आल्याचे मानले जात आहे.महाराष्ट्रासह देशपातळीवर आयोजित विविध सेमिनार, परिषद, कार्यशाळा आणि शैक्षणिक उपक्रमांमध्ये त्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला आहे. विविध सल्लागार समित्यांवर सदस्य म्हणून काम करताना त्यांनी पर्यावरण संवर्धन आणि संशोधन क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. तसेच विविध स्वयंसेवी संस्थांशी संलग्न राहून सामाजिक व पर्यावरणविषयक उपक्रमांमध्येही ते सातत्याने कार्यरत आहेत.डॉ. नितीन पडवळ यांच्या निवडीबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. उद्धव बोराडे, उपाध्यक्ष प्रा. डी. डी. बोराडे, सचिव मुरलीधर काटे, सहसचिव डॉ. संतोष शिंदे, कोषाध्यक्ष अतुल सुरवसे, प्रा. डॉ. तानाजी बोराडे, संस्थेचे सदस्य उत्तम चाचा बोराडे, महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. अनुराधा जगदाळे, प्रा. किशोरकुमार गव्हाणे तसेच शंकरराव पाटील कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

पेड दर्शनातून मंदिर संस्थानला दोन कोटींचे उत्पन्न; उन्हाळी सुट्ट्या व अधिक मासामुळे भाविकांची विक्रमी गर्दी

# अधिक महिन्यात पेड दर्शनाला भाविकांची पसंती; 17 दिवसांत 70 हजारांहून अधिक भक्तांनी घेतले देणगी दर्शन





सूरज बागल। आरंभ मराठी

**तुळजापूर - सध्या सुरू असलेल्या अधिक मासामुळे तुळजाभवानी मंदिरात भाविकांची गर्दी मोठ्या प्रमाणात होत असून दररोज हजारोच्या संख्येने भाविक दाखल होत आहेत. दरम्यान, अधिक मासाचा फायदा मंदिर संस्थानलाही चांगलाच होताना दिसून आला असून पेड दर्शनाच्या माध्यमातून मंदिर संस्थानला 15 मे ते 30 मे या कालावधीत जवळपास दोन कोटी रुपयांचे उत्पन्न मिळाले आहे. पेड देणगी दर्शनास भाविकांची मोठी पसंती मिळत असून या कालावधीत जवळपास 70 हजार भाविकांनी पेड दर्शन घेतले आहे. आगामी काळातही ही गर्दी कायम राहिल्यास मंदिर संस्थानच्या तिजोरीत आणखी मोठी भर पडण्याची शक्यता वर्तवली जात आहे.**

तीन वर्षांतून एकदा येणाऱ्या अधिक महिन्यात देवदर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी होत असते. यावर्षी त्यात उन्हाळी सुट्ट्यांची भर पडल्याने शहरी भागातील भाविकही मोठ्या संख्येने तुळजाभवानी मातेच्या दर्शनासाठी तुळजापूरात दाखल होत आहेत. तुळजाभवानी माता ही महाराष्ट्राची कुलस्वामिनी असून देशभरातून भाविक दर्शनासाठी तुळजापूरात येत असतात. महाराष्ट्रासह आंध्र प्रदेश, कर्नाटक आणि तेलंगणामधील भाविकांची संख्याही लक्षणीय आहे. सध्याच्या काळात अनेक भाविक रांगेत थांबण्यापेक्षा थेट दर्शन घेण्यास प्राधान्य देत आहेत. यासाठी तुळजाभवानी मंदिर संस्थानकडून 200 रुपये व 500 रुपयांचे पेड दर्शन पास उपलब्ध करून देण्यात आले आहेत. या पाससाठी मोठ्या प्रमाणात भाविक गर्दी करत असून 15 मे ते 30 मे या कालावधीत हजारो भाविकांनी या सुविधेचा लाभ घेतला आहे. यामधून मंदिर संस्थानला जवळपास दोन कोटी रुपयांचे उत्पन्न मिळाले असून अजूनही भाविकांचा ओघ कायम असल्याने संस्थानच्या उत्पन्नात आणखी वाढ होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

## 200 रुपयांच्या देणगी पासमधून 1 कोटी 3 लाखांहून अधिक उत्पन्न

15 मे ते 30 मे या कालावधीत 200 रुपयांचे देणगी दर्शन पास एकूण 51 हजार 776 भाविकांनी घेतले आहेत. यापैकी 48 हजार 733 भाविकांनी ऑफलाइन पद्धतीने पास काढले, तर 3 हजार 48 भाविकांनी ऑनलाइन पद्धतीने पास घेतले आहेत. या पासमधून मंदिर संस्थानला 1 कोटी 3 लाख 55 हजार 200 रुपये इतके उत्पन्न मिळाले आहे.

## 500 रुपयांच्या दर्शन पासमधून 94 लाखांहून अधिक महसूल

याच कालावधीत 500 रुपयांचे दर्शन पास एकूण 18 हजार 838 भाविकांनी घेतले आहेत. यापैकी 16 हजार 799 भाविकांनी ऑफलाइन पास घेतले, तर 2 हजार 39 भाविकांनी ऑनलाइन पद्धतीने पास काढले आहेत. या माध्यमातून मंदिर संस्थानच्या तिजोरीत 94 लाख 19 हजार रुपये जमा झाले आहेत. दोन्ही प्रकारच्या देणगी दर्शन पासमधून मंदिर संस्थानला एकूण 1 कोटी 97 लाख 74 हजार 200 रुपये इतके उत्पन्न प्राप्त झाले आहे.

## बाजारपेठेलाही भाविकांच्या गर्दीचा लाभ

यावर्षी उन्हाळी सुट्ट्या आणि अधिक मास असा दुहेरी योग जुळून आल्याने मोठ्या संख्येने भाविक दर्शनासाठी तुळजापूरात येत आहेत. लग्नसराई संपल्यानंतरही भाविकांची गर्दी कायम असून सकाळपासूनच तुळजापूर नगरी भाविकांनी गजबजून जात आहे. भाविक मोठ्या प्रमाणात बाजारपेठेत खरेदी करत असल्याने स्थानिक व्यापाऱ्यांमध्येही उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून तुळजापूरची बाजारपेठ सध्या तेजीत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाकडून डॉ. सोनाली जाधव यांना 'भौतिकशास्त्र' विषयातील पीएच.डी. प्रदान



आरंभ मराठी । अणदूर

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,छत्रपती संभाजी नगर यांच्याकडून डॉ. सोनाली जाधव यांना भौतिकशास्त्र विषयातील पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली. त्यांनी ' रेअर अर्थ आयन सबस्टिट्यूशन इफेक्ट ऑन द प्रॉपर्टीज ऑफ गॅडोलिनियम आयर्न गारनेट नॅनो पार्टिकल्स' या विषयावर संशोधन केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. अंकुश कदम यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी संशोधन केले. ग्रामीण भागातील विद्यार्थिनीने यश संपादन केल्याबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे. या यशाबद्दल माजी मंत्री मधुकरराव चव्हाण, शिक्षण प्रसारक मंडळ अणदूरचे अध्यक्ष भारत कस्तुरे, सचिव रामचंद्र आलूरे, जवाहर महाविद्यालय विकास समितीचे सदस्य, प्रा. भालचंद्र बिराजदार, ॲड.लक्ष्मीकांत पाटील, विक्रम आलूरे, प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी, उपप्राचार्य डॉ. मल्लिनाथ लंगडे, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ.अंकुश कदम जवाहर महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

# हिंगळजवाडी येथे कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची ग्रामभेट

## शेतकऱ्यांशी साधला संवाद




आरंभ मराठी । तेर

धाराशिव तालुक्यातील आळणी (गडपाटी) येथील कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांच्या वतीने हिंगळजवाडी येथे ग्रामीण कृषी कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत ग्रामभेट दौरा व परिचय बैठक उत्साहात पार पडली. सोमवारी (दि.१) बी.एस्सी. ॲग्रीकल्चर अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांकडून राबविण्यात येणाऱ्या RAWE कार्यक्रमाच्या अनुषंगाने ही भेट आयोजित करण्यात आली होती. यावेळी विद्यार्थ्यांनी ग्रामस्थांची भेट घेऊन कार्यक्रमाची सविस्तर माहिती दिली. तसेच ग्रामीण कृषी विकासामध्ये विद्यार्थ्यांची भूमिका, शेतकऱ्यांसाठी उपयुक्त कृषी उपक्रम आणि आगामी काळात राबविण्यात येणाऱ्या विविध कृषी विषयक योजनांबाबत चर्चा करण्यात आली. ग्रामपंचायत प्रशासनाच्या वतीने विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. तसेच या उपक्रमासाठी पूर्ण सहकार्य करण्याची भूमिका ग्रामपंचायतीने व्यक्त केली. सुरज माने, आशिष नागुलकर, यश मुळे, नीरज पांडव, सज्जन पडवळ, आदर्श लाटे, रोहन शिरसागर, संदेश मालव आदी विद्यार्थ्यांनी कृषी विषयक मार्गदर्शन करून ग्रामस्थांना विविध उपयुक्त माहिती दिली. कृषी महाविद्यालयाचे डॉ. देवानंद शेटे व डॉ. रोहित इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

# तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयात जीवनकौशल्य. सायबर सुरक्षा व आत्मसंरक्षण विषयावर कार्यशाळा

आरंभ मराठी । धाराशिव

तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयात विद्यार्थिनींच्या सर्वांगीण विकासासह त्यांच्या सुरक्षिततेबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने 'लाइफ स्किल आणि महिला सुरक्षा' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थिनींनी या कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यशाळेच्या प्रमुख मार्गदर्शिका शलाका जाधव यांनी जीवनकौशल्यांचे महत्त्व, व्यक्तिमत्त्व विकास, संवादकौशल्य, निर्णयक्षमता, आत्मविश्वास वृद्धी आणि तणाव व्यवस्थापन या विषयांवर सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच अभियांत्रिकी शाखेतील विद्यार्थिनींनी वैयक्तिक सुरक्षिततेसाठी घ्यावयाची काळजी, सायबर गुन्ह्यांपासून संरक्षण, सामाजिक माध्यमांचा जबाबदारीने वापर, आपत्कालीन परिस्थितीत योग्य निर्णय घेण्याची क्षमता आणि आत्मसंरक्षणाचे महत्त्व याबाबतही त्यांनी मार्गदर्शन केले. यावेळी विद्यार्थिनींनी विविध प्रश्न विचारून आपल्या शंकांचे निरसन करून घेतले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने होते. तेरणा पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टच्या मुख्य मानव संसाधन अधिकारी (सीएचआरओ) अनुराधा देशपांडे तसेच सॉफ्ट स्किल डेव्हलपर धनिया मेनन यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी अनुराधा देशपांडे यांनी विद्यार्थिनींना संबोधित करताना, अडचणीच्या प्रसंगी आपल्या समस्या वरिष्ठांपर्यंत पोहोचवाव्यात, ट्रस्ट सातत्याने विद्यार्थिनींच्या पाठीशी असल्याचे सांगितले. महिलांच्या सुरक्षेसाठी ट्रस्ट स्तरावर समिती कार्यरत असून, विद्यार्थिनींच्या मार्गदर्शनासाठी तेरणा ट्रस्ट नेहमी तत्पर राहील, असे त्यांनी स्पष्ट केले.प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने यांनी शिक्षणाबरोबरच जीवनकौशल्ये आणि सुरक्षिततेची जाणीव असणे ही काळाची गरज असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महिला तक्रार निवारण समितीच्या वतीने करण्यात आले. सूत्रसंचालन प्रा. सुनिता गुंजाळ यांनी केले. यावेळी समितीच्या प्रमुख प्रा. सुनिता गुंजाळ, विभागप्रमुख डॉ. प्रीती माने, प्रा. सुजाता गायकवाड, डॉ. राजश्री यादव यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक आणि मोठ्या संख्येने विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

# पारा येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती उत्साहात साजरी

## प्रबोधनपर व्याख्यानातून विचारांचा जागर

आरंभ मराठी । पारा



पारा येथे लोकमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त विविध सामाजिक व प्रबोधनात्मक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या निमित्त आयोजित करण्यात आलेल्या व्याख्यान कार्यक्रमास ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. जयंतीनिमित्त आयोजित विशेष व्याख्यानात व्याख्याते राहुल गिरी यांनी अहिल्यादेवी होळकर यांच्या लोककल्याणकारी, न्यायप्रिय आणि दूरदर्शी कार्याचा सविस्तर आढावा घेत उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यांच्या विचारांनी आणि कार्याने आजच्या पिढीने प्रेरणा घेण्याची गरज असल्याचे त्यांनी आपल्या भाषणातून अधोरेखित केले. यावेळी गावातील विविध महापुरुषांच्या प्रतिमांचे पूजन करून त्यांच्या कार्याला अभिवादन करण्यात आले. तसेच सामाजिक ऐक्य, बंधुता आणि सर्वधर्मसमभावाचा संदेश देत जयंती उत्सव साजरा करण्यात आला. कार्यक्रमात सर्व समाजघटकांतील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून सामाजिक एकतेचे दर्शन घडविले. जयंती उत्सवानिमित्त महिला भगिनी, लहान मुली तसेच विद्यार्थिनींनी अहिल्यादेवींच्या जीवनकार्यावर आधारित प्रभावी भाषणे सादर केली. त्यांच्या वक्तृत्वाला उपस्थितांनी भरभरून दाद दिली. याशिवाय बालके, युवक आणि ज्येष्ठ नागरिक यांनीही उत्साहाने सहभाग घेत कार्यक्रमाची शोभा वाढविली. संपूर्ण परिसरात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडलेल्या या जयंती सोहळ्यात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक व लोकहितवादी कार्याचा उजाळा देण्यात आला. त्यांच्या आदर्श विचारांचे स्मरण करत समाजहितासाठी कार्य करण्याचा संकल्प उपस्थितांनी व्यक्त केला.

आरंभ मराठी | विधान परिषद निवडणुकीत राज्यात सर्वाधिक मताधिक्याने जिंकण्याचा महायुतीला विश्वास

# महायुतीच्या विकासाच्या धोरणाला गती देणार - बसवराज पाटील



## मी नाराज नाही — दत्ताभाऊ कुलकर्णी

विधानपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उमेदवारी न मिळाल्याने आपण नाराज असल्याच्या चर्चांना यावेळी दत्ताभाऊ कुलकर्णी यांनी स्पष्ट शब्दांत फेटाळून लावले. आपण पक्षाचा आदेश मानणारा एक सामान्य कार्यकर्ता असल्याचे सांगत त्यांनी पक्षाने आजपर्यंत न मागता अनेक जबाबदाऱ्या आणि संधी दिल्या असल्याचे नमूद केले. पक्षाने सध्या संघटनात्मक जबाबदारी सोपवली असून ती आपण पूर्ण निष्ठेने आणि प्रामाणिकपणे पार पाडत असल्याचे त्यांनी सांगितले. विधानपरिषद निवडणुकीसाठी आपण इच्छुक होतो, हे खरे असले तरी उमेदवारी मिळाली नाही म्हणून कोणतीही नाराजी नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पक्षाच्या निर्णयामागे उभे राहून महायुतीच्या उमेदवाराच्या विजयासाठी पूर्ण ताकदीने काम करणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

आरंभ मराठी । धाराशिव

धाराशिव-लातूर-बीड स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विधानपरिषद निवडणुकीसाठी महायुतीचे उमेदवार म्हणून उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर बसवराज पाटील यांनी विजयाचा विश्वास व्यक्त केला. अनेकजण इच्छुक असतानाही महायुतीने या महत्त्वाच्या जागेसाठी आपल्यावर विश्वास दाखवला, याचा आनंद असल्याचे सांगत त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विकासाभिमुख धोरणांना पुढे नेण्यासाठी प्रामाणिकपणे कार्य करणार असल्याचे स्पष्ट केले. उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना बसवराज पाटील म्हणाले की, निवडणूक ही केवळ राजकीय स्पर्धा नसून ती विचारांची लढाई असते. महायुतीने 'सबका साथ, सबका विकास आणि सबका प्रयास' हा विकासाचा विचार स्वीकारला असून त्याच विचारातून देश, राज्य आणि जिल्ह्याच्या सर्वांगीण प्रगतीचे व्हिजन राबवले जात आहे. या विकासाच्या प्रवासात मतदारांनी आपल्याला सेवा करण्याची संधी द्यावी, असे आवाहन त्यांनी केले. पारदर्शकता, निष्ठा आणि पदाला न्याय देण्याची भूमिका आपण कायम ठेवणार असल्याचे सांगत बसवराज पाटील यांनी नगरपालिका, नगरपंचायत आणि जिल्हा परिषदांशी संबंधित अनेक प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी विशेष प्रयत्न करणार असल्याचे नमूद केले. धाराशिव आणि लातूर या दोन्ही जिल्ह्यांशी आपला निकटचा संबंध असल्याचे सांगताना त्यांनी बीड जिल्ह्यातही भाजपने भक्कम संघटन उभारले असून विकासकामांच्या बळावर मतदारांचा विश्वास मिळाल्यामुळे विजयाची खात्री असल्याचे सांगितले. यावेळी भाजपचे धाराशिव जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांनीही महायुतीच्या विजयाचा विश्वास व्यक्त केला. ते म्हणाले की, मागील विधानपरिषद निवडणुकीत संख्याबळ कमी असतानाही सुरेश धस यांना विजय मिळाला होता. यावेळी महायुतीकडे मजबूत संख्याबळ असल्यामुळे विजय अधिक निश्चित झाला आहे. राज्यात सध्या होत असलेल्या १७ विधानपरिषद निवडणुकांपैकी धाराशिव-लातूर-बीड स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून सर्वाधिक मताधिक्याने महायुतीचा उमेदवार विजयी होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. महायुती ही निवडणूक पूर्ण एकजुटीने लढवणार असून तीनही जिल्ह्यांतील कार्यकर्ते आणि पदाधिकारी समन्वयाने काम करतील, असेही कुलकर्णी म्हणाले. बसवराज पाटील हे अनुभवी, अभ्यासू आणि संघटनात्मक कामाचा मोठा अनुभव असलेले नेते आहेत. त्यांच्या उमेदवारीमुळे धाराशिव, लातूर आणि बीड या तिन्ही जिल्ह्यांच्या विकासाला चालना मिळेल. धाराशिव जिल्ह्यात भाजपचे सर्वाधिक मतदार असून महायुतीतील घटक पक्षांचाही त्यांना भक्कम पाठिंबा मिळणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पत्रकार परिषदेला उमेदवार बसवराज पाटील, भाजपचे धाराशिव जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी, माजी आमदार सुजितसिंह ठाकूर, भाजप नेते नितीन काळे, अरविंद पाटील निलंगेकर, बीड भाजप अध्यक्ष शंकरराव देशमुख, शिवसेना नेते अनिल खोचरे, आयुष्यमान भारतचे डॉ. ओमप्रकाश शेटे तसेच जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा अस्मिता कांबळे यांच्यासह महायुतीचे अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

# तुळजाभवानी मंदिरातील बोगस पुजाऱ्यांवर कारवाईची मागणी

## ओळखपत्र सक्तीचे करण्याचे निवेदन

आरंभ मराठी । तुळजापूर



श्री तुळजाभवानी मंदिर परिसरात पुजारी असल्याचे भासवून भाविकांची फसवणूक करणाऱ्या अनधिकृत व बोगस पुजाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, त्यांचा मंदिर प्रवेश बंद करावा तसेच सर्व अधिकृत पुजाऱ्यांना बायोमेट्रिक ओळखपत्र देऊन ओळखपत्र सक्तीचे करावे, अशी मागणी तुळजापूर येथील पुजारी बांधवांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनात म्हटले आहे की, श्री तुळजाभवानी मंदिर परिसरात अनधिकृत पुजाऱ्यांचा वावर मोठ्या प्रमाणात वाढला असून हे व्यक्ती धोतर परिधान करून भाविकांना पूजेसाठी विचारणा करत आहेत.

स्वतःला पुजारी म्हणून भासवून ते भाविकांची दिशाभूल व आर्थिक फसवणूक करत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. यामुळे मूळ हक्कदार पुजाऱ्यांची नाहक बदनामी होत असून मंदिराच्या सुरक्षेलाही धोका निर्माण होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

निवेदनानुसार, काही अनधिकृत व्यक्तींकडे बोगस ओळखपत्रे असून ते वारंवार मंदिराच्या गर्भगृहात प्रवेश करत आहेत. या प्रकारांवर कोणताही प्रभावी नियंत्रण नसल्याचे नमूद करत मंदिर संस्थानच्या अधिकाऱ्यांनी याकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच मंदिर संस्थानच्या वतीने सर्व अधिकृत पुजाऱ्यांना लवकरात लवकर बायोमेट्रिक ओळखपत्रे वितरित करावीत. त्यास विलंब होत असल्यास सध्याची ओळखपत्रे सक्तीची करावीत आणि संस्थानमधील जबाबदार अधिकाऱ्यांची समिती नेमून ओळखपत्रांची कडक तपासणी करावी, अशीही मागणी करण्यात आली आहे. यामुळे मंदिर परिसर व गर्भगृहात अनधिकृत व्यक्तींना प्रवेश रोखता येईल आणि भाविकांची फसवणूक टाळता येईल, असे निवेदनात म्हटले आहे. दरम्यान, या मागण्यांवर तातडीने कार्यवाही न झाल्यास लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्याचा इशाराही पुजारी बांधवांनी दिला आहे. यावेळी शहरातील पुजारी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अहमदिया मुस्लिम युवक संघाच्या वार्षिक इज्तेमास उत्स्फूर्त प्रतिसाद

## रक्तदान शिबिरासह विविध स्पर्धांचे आयोजन



मजलिस आरंभ मराठी । धाराशिव

खुद्दामुल अहमदिया उस्मानाबाद (अहमदिया मुस्लिम युवक संघ) यांच्या वतीने दि. 30 व 31 मे रोजी वार्षिक इज्तेमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. या दोन दिवसीय कार्यक्रमात खुद्दाम (युवक) व अत्फाल (लहान मुले) यांनी विविध क्रीडा, शैक्षणिक आणि आध्यात्मिक उपक्रमांमध्ये उत्साहाने सहभाग नोंदविला. इज्तेमाच्या पहिल्या दिवशी कुरआन पठण, भाषण, कविता सादरीकरण, प्रश्नमंजुषा तसेच विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. सहभागींच्या बौद्धिक विकासासाठी ज्ञानवर्धक प्रदर्शनीही भरविण्यात आली होती. या प्रदर्शनीत सामाजिक, धार्मिक आणि शैक्षणिक विषयांवरील माहिती आकर्षक पद्धतीने सादर करण्यात आली. दि. 30 मे रोजी सकाळी खिदमते खल्क विभागामार्फत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या रक्तपेढीच्या सहकार्याने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिराला महिला व पुरुष रक्तदात्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. रक्तदात्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. अधिष्ठाता डॉ. शैलेंद्र चौहान यांच्या हस्ते रक्तदात्यांचा सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. या उपक्रमासाठी डॉ. शैलेंद्र चौहान, डॉ. विवेक कोळगे, डॉ. दीपमाला, विठ्ठल कांबळे, नगरसेवक सिद्धार्थ दादा बनसोडे, विष्णू गलांडे, नीलाक्षी जानराव, आशाताई कांबळे, अविनाश रणखांब, तिरुपती केंद्रे, जाकीर शेख, गणेश साळुंखे आणि शेख रौफ यांनी मोलाचे सहकार्य केले. दि. 31 मे रोजी सायंकाळी इज्तेमाचा समारोप सोहळा उत्साहात पार पडला. विविध क्रीडा व शैक्षणिक स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या सहभागींचा ट्रॉफी, पदके आणि प्रमाणपत्रे देऊन सन्मान करण्यात आला. समारोप कार्यक्रमातून शिस्त, बंधुभाव, सेवा आणि नैतिक मूल्यांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. या वार्षिक इज्तेमात अहमदिया मुस्लिम युवक संघाचे जिल्हाध्यक्ष रागेब अलीम, शहराध्यक्ष नदीम अहमद, अध्यक्ष जमात अब्दुल समद, डॉ. बशारत अहमद, अब्दुल लतीफ, अब्दुल अलीम, प्रचारक मकबूल अहमद, [illegible], इल्यास अहमद, मुदस्सर अहमद, अब्दुल नईम, शहरयार अहमद, सजील अहमद, आदिल अहमद, मुताहेर अहमद, तौसिफ अहमद, माजीन अहमद, शफीक अहमद, मंजूम अहमद, सिकंदर अहमद, फारीस अहमद तसेच इतर मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विशाल कणसे यांच्या पुढाकारातून 27 रुग्णांना मोफत नेत्रशस्त्रक्रियेची संधी



**मुरुड** : ग्रामीण भागातील गरजू नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने सामाजिक कार्यकर्ते विशाल कणसे यांच्या पुढाकारातून मुरुड व परिसरातील २७ रुग्णांना मोफत नेत्रशस्त्रक्रियेसाठी सोलापूर येथील शंकरशेठ साबळे आय हॉस्पिटलकडे रवाना करण्यात आले. मुरुड ग्रामपंचायत कार्यालय परिसरातून सोमवारी सकाळी ९ वाजता विशेष बसद्वारे रुग्णांची रवानगी करण्यात आली. ग्रामीण भागातील अनेक ज्येष्ठ नागरिक तसेच आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांतील रुग्णांना डोळ्यांच्या आजारांवर वेळेवर उपचार मिळण्यात अडचणी येतात. ही बाब लक्षात घेऊन विशाल कणसे यांनी यापूर्वी मोफत नेत्रतपासणी शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिरात तपासणी करण्यात आलेल्या रुग्णांपैकी शस्त्रक्रियेची आवश्यकता असलेल्या २७ रुग्णांची निवड करण्यात आली. निवड झालेल्या रुग्णांना मोतीबिंदूसह विविध नेत्रविकारांवरील शस्त्रक्रिया व उपचारांचा लाभ मिळणार आहे. रुग्णांच्या प्रवासापासून ते उपचारांपर्यंत सर्व व्यवस्था करण्यात आल्याने लाभार्थ्यांवर कोणताही आर्थिक भार पडणार नाही. त्यामुळे अनेक कुटुंबांना मोठा दिलासा मिळाला आहे. ग्रामीण भागातील नागरिकांना आरोग्यसेवा सहज उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वाचा ठरत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. यावेळी रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांनी विशाल कणसे यांच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक करत आभार मानले.समाजातील गरजू घटकांना आरोग्य सुविधांचा लाभ मिळावा यासाठी भविष्यातही विविध आरोग्यविषयक उपक्रम राबविण्याचा मानस असल्याचे विशाल कणसे यांनी सांगितले.